जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 3 NOV 2026 पुण्यनगरी

विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाधारित कौशल्ये देण्याची गरज

कुलगुरू डॉ. राजनीश कामत : शिवाजी विद्यापीठाचा 'टॅली'समवेत सामंजस्य करार

कोल्हापूर : प्रतिनिधी

आजच्या काळात विद्यार्थ्यांना केवळ पारंपरिक शिक्षण देऊन चालणार नाही, तर त्यांना तंत्रज्ञानावर आधारित कौशल्ये देणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने टॅली एज्युकेशनसमवेत झालेला सामंजस्य करार महत्त्वाचा ठरेल, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठ आणि टॅली एज्युकेशन अँड डिस्ट्रिब्युशन सर्व्हिसेस यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढण्यास मोठी मदत होईल, तसेच इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध करून देणे सुलभ होईल. उद्योग व व्यवसाय क्षेत्राच्या गरजा ओळखून विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करणे हे विद्यापीठाचे उद्दिष्ट आहे आणि हा करार त्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व टॅली एज्युकेशन सामंजस्य करारप्रसंगी कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, टॅलीच्या उपाध्यक्ष भुवनेश्वरी बी. आदी मान्यवर.

टॅली एज्युकेशनच्या कार्यकारी उपाध्यक्ष भुवनेश्वरी बी. म्हणाल्या, शैक्षणिक संस्था आणि कौशल्य प्रशिक्षण देणाऱ्या संस्था यांनी हातात हात घालून काम केले, तरच विद्यार्थ्यांना काळाच्या गरजेनुसार शिक्षण देता येईल. या करारांतर्गत टॅलीचे प्रमाणपत्र (सर्टिफिकेट), पदविका (डिप्लोमा) आणि प्रगत पदविका (ॲडव्हान्स्ड डिप्लोमा) असे विविध अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

सामंजस्य करारावर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी, तर टॅली एज्युकेशनच्या वतीने कार्यकारी उपाध्यक्ष भुवनेश्वरी बी. यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. स्वागत परुळेकर, अधिसभा सदस्य काव्यश्री नलावडे, मनोज पाटील, श्रीनिवास गायकवाड, डॉ. तेजपाल मोहरेकर, पंकज शहा, गिरीश राठी आदी उपस्थित होते. वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. केदार मारुलकर यांनी प्रास्ताविक केले. टॅली एज्युकेशनचे सहायक व्यवस्थापक तथा क्षेत्रीय व्यवस्थापक (पश्चिम) चिंतामणी पाटील यांनी आभार मानले.

03 NOV 2026

जनप्रवास

शिक्षणातील डिजिटल परिवर्तनासाठी तंत्रज्ञान महत्वाचे

कुलगुरु डॉ. राजनीश कामत यांचे प्रतिपादन

जनप्रवास : कोल्हापूर

शिक्षणातील डिजिटल परिवर्तनासाठी तंत्रज्ञानाची भूमिका महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. राजनीश कामत यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र व महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी आयोजित 'ई -कन्टेन्ट विकसन' या विषयावरील तीन दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.



डॉ. कामत म्हणाले, स्वयम, मूक यांसारख्या माध्यमातून विद्यार्थ्यांना निःशुल्क स्वरूपात ज्ञान प्राप्त करण्याची संधी मिळते. कारण या कोर्सेसना प्रवेशासाठी कोणतेही शुल्क नसते, केवळ प्रमाणपत्र शुल्क असते. ई-कंटेंटच्या फोरमद्वारे विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे साहित्य उपलब्ध केले जाते. यामध्ये ई-टेक्स्ट, ई-ट्युटोरियल्स, वेब रिसोर्सेस, सेल्फ असेसमेंट इत्यादींचा समावेश असतो. विद्यार्थी व शिक्षकांना प्रभावी अध्ययन-अध्यापन कार्य करता येणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे डॉ. कामत म्हणाले. सुरजकुमार बाबर म्हणाले, शिक्षकांनी सध्याच्या बदलत्या डिजिटल गरजा ओळखून सर्व शिक्षकांनी ई-कंटेंट निर्मितीच्या आधुनिक पद्धती समजून घ्यावे.

संचालक डॉ. प्रतीभा पाटणकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. कृष्णा पाटील यांनी परिचय करून दिला. प्रियांका सुर्वे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नगीना माळी यांनी आभार मानले. यावेळी महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेच्या नवनिर्मिती आणि अद्ययावत तंत्रज्ञान केंद्र प्रमुख इंजि. सुरजकुमार बाबर, अमरावती येथील संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संगणक विभागाचे डॉ. सुहास पाचपांडे, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेचे डॉ. भार्गव वाळुंज, उपकुलसचिव विनय शिंदे आदी उपस्थित होते.

0 3 NOV 2026
पुढारी

शिक्षणातील डिजिटल परिवर्तनासाठी तंत्रज्ञानाची भूमिका महत्त्वाची

कुलगुरू डॉ. आर. के. कामत; विद्यापीठात फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे उद्घाटन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिक्षणातील डिजिटल परिवर्तनासाठी तंत्रज्ञानाची भूमिका महत्त्वाची आहे. शिक्षकांनी डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करून दर्जेदार शैक्षणिक साहित्य विकसित करावे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र व महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी आयोजित 'ई-कंटेंट विकसन' या विषयावरील तीनदिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. डॉ. कामत म्हणाले, ऑनलाईन माध्यमांमुळे विद्यार्थ्यांना विनामूल्य ज्ञान मिळविण्याची संधी उपलब्ध झाली आहे. ई-कंटेंटच्या माध्यमातून ई-टेक्स्ट, ई-ट्युटोरियल्स, वेब रिसोर्सेस आणि स्वयंमूल्यांकन यांसारखे विविध शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना उपलब्ध होते. त्यामुळे शिक्षकांनी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून प्रभावी अध्ययन-अध्यापनासाठी ई-कंटेंट विकसित करणे आवश्यक आहे. सूरजकुमार बाबर यांनी शिक्षकांनी बदलत्या डिजिटल गरजा ओळखून ई-कंटेंट निर्मितीच्या आधुनिक पद्धती आत्मसात कराव्यात, असे आवाहन केले. यावेळी डॉ. सुहास पाचपांडे, डॉ. भार्गव वाळुंज, उपकुलसचिव विनय शिंदे उपस्थित होते. डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. कृष्णा पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रियांका सुर्वे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नगीना माळी यांनी आभार मानले.



कोल्हापूर : उद्घाटन समारंभात बोलताना कुलगुरू डॉ. आर. के. कामत. (छाया : पप्पू अत्तार)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 3 NOV 2026 जनप्रवास

विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाधारित कौशल्ये देण्याची गरज : डॉ. राजनीश कामत

- शिवाजी विद्यापीठाचा 'टॅली'समवेत सामंजस्य करार



शिवाजी विद्यापीठाने टॅली एज्युकेशनसमवेत सामंजस्य करारप्रसंगी कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, टॅलीच्या उपाध्यक्ष भुवनेश्वरी बी., डॉ. केदार मारुलकर, श्रीनिवास गायकवाड, स्वागत परुळेकर, काव्यश्री नलावडे, चिंतामणी पाटील.

जनप्रवास : कोल्हापूर

आजच्या काळात विद्यार्थ्यांना केवळ पारंपरिक शिक्षण देऊन चालणार नाही, तर त्यांना तंत्रज्ञानावर आधारित कौशल्ये देणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने टॅली एज्युकेशनसमवेत झालेला सामंजस्य करार महत्त्वाचा ठरेल, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) राजनीश कामत यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठ आणि टॅली एज्युकेशन अँड डिस्ट्रिब्युशन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला, त्या वेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढण्यास मोठी मदत होईल. सामंजस्य करारावर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी तर टॅली एज्युकेशनच्या वतीने कार्यकारी उपाध्यक्ष भुवनेश्वरी बी. यांनी स्वाक्षरी केल्या. वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. केदार मारुलकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. टॅली एज्युकेशनचे सहायक व्यवस्थापक तथा क्षेत्रीय व्यवस्थापक (पश्चिम) चिंतामणी पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 3 NOV 2026 तरुण भारत

पर्यटनवाढीसाठी 'गगनबावडा बाईक राईड'चा उपक्रम

कुलगुरु डॉ. रजनीश कामत यांच्याकडून कौतुक : नेपाळ मोहिमेची पूर्वतयारी म्हणून रॅली

त. भा. प्रतिनिधी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'गगनबावडा बाईक राईड २०२६'ला शुभेच्छा देताना कुलगुरू डॉ. रजनीश कामत. शेजारी कर्नल विक्रम नलवडे, केतन चव्हाण, अश्विन शिंदे, प्रशांत काशीद, डॉ. नचिकेत पाटील आदी.

कोल्हापूर : जिल्ह्यातील पर्यटनस्थळांची ओळख व्यापक करण्यासह पर्यटनवाढीला चालना देण्याचा दृष्टीने ४ बाय ४ कोल्हापूर स्पोर्टस् क्लबने आयोजित केलेली 'गगनबावडा बाईक राईड २०२६' रॅली स्तुत्य आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी केले.

रेडमड ४ बाय ४ ऑफ – रोड चॅलेंज'च्या वतीने आयोजित या रॅलीला शनिवारी शिवाजी विद्यापीठातून शुभेच्छा देऊन मार्गस्थ केले. ३१ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबरदरम्यान होणारी रॅली केवळ पर्यटनासाठीची सफर नसून, १६ नोव्हेंबर रोजी नियोजित नेपाळ बाईक मोहिमेची पूर्वतयारी आहे. या माध्यमातून रायडर्सच्या मोटारसायकलींची क्षमता, वाहन चालविण्यांचे कौशल्य, संघातील समन्वय आणि सहनशक्तीची चाचणी घेतली जाणार आहे.

या रॅलीला शनिवारी पहाटे पुण्यातून सुरुवात झाली. कोल्हापुरात भोजन आणि इंधनासाठी थांबा घेण्यात आला. त्यानंतर गगनबावडा घाटातील मार्गावरून पुढील प्रवास सुरू झाला. रविवारी सकाळी सूर्योदयावेळी राईड, छायाचित्रण सत्र आणि गगनबावडा परिसरातील छोट्या राईडचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानंतर परतीचा प्रवास सुरू होणार आहे. दरम्यान, दसरा चौक येथे या रॅलीचे भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी स्वागत केले. कोल्हापूर स्पोर्ट्स क्लबचे प्रशांत काशीद म्हणाले, पर्यटनाला चालना देणे हा या रॅलीमागील प्रमुख उद्देश आहे. यावेळी अश्विन शिंदे, प्रकाश मुजुमदार, नितीन जोशी, प्रवीण जवळकर, डॉ. नचिकेत पाटील, कर्नल विक्रम नलवडे, कोल्हापूर स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष केतन चव्हाण आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज ब्रेक्यूज

03 NOV 2026



सरदार पटेल, इंदिरा गांधी यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर, (महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज):

भारताचे लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा स्मृतिदिन या निमित्ताने त्यांच्या स्मृतींना आज शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आज सकाळी सरदार पटेल आणि इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांना कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. तद्नंतर, सर्व उपस्थितांनी एकता व सद्भावना यांची शपथ घेतली. डॉ. प्रमोद कसबे यांनी शपथ प्रदान केली.

यावेळी कुलसचिव डॉ.विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. अजितसिंह जाधव, स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. किरण कुमार शर्मा, रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेलचे समन्वयक डॉ. तुकाराम डोंगळे, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. संतोष सुतार, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. सुर्यबाला सावंत, डॉ. देवश्री पाटील, डॉ. सोमनाथ पवार, डॉ. स्नेहा पाटील, डॉ. योजना पाटील, डॉ. तेजस्विनी भट यांच्यासह विविध अधिविभागांचे शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

03 NOV 2026

कोतीसिंह

जलसंवर्धन-नदी पुनरुज्जीवन-पर्यावरण संरक्षण ही गरज

कोल्हापूर(प्रतिनिधी):- शाश्वत विकासासाठी जल संवर्धन, जंगलांचे संरक्षण आणि पर्यावरणीय परिसंस्थेचे जतन करणे ही काळाची गरज आहे. पर्यावरणाचे संरक्षण करणे हा विवेक आहे, तर पर्यावरणाच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरणे ही विकृती आहे. त्यामुळे नव्या पिढीला निसर्ग संवर्धनासाठी तयार करण्याबरोबरच शेतकरी व नागरिकांमध्ये जलसाक्षरता निर्माण करण्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन प्रसिद्ध जलतज्ज्ञ आणि 'जलपुरुष' डॉ. राजेंद्र सिंह यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्र, कॉ. दत्ता देशमुख अध्ययन केंद्र आणि नेहरू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते.

डॉ. राजेंद्र सिंह म्हणाले की, शिवाजी विद्यापीठाने आपल्या परिसरात जलसंवर्धनाचे महत्त्व पूर्ण काम केले आहे. पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्या बरोबरच उपलब्ध संसाधनांचा विवेकी वापर करण्याचे उदाहरण विद्यापीठाने निर्माण केले आहे. मात्र,शाश्वत विकासाची प्रक्रिया एका दिवसात पूर्ण होत नाही. त्यासाठी अनेक वर्षे सातत्याने प्रयत्न करावे लागतात. पाण्याचे संवर्धन, जंगलांचे संरक्षण आणि पर्यावरणीय परिसंस्थेचे जतन यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी समाजातील विवेक जागृत करण्याची गरज अधोरेखित करत ते म्हणाले, की नव्या पिढीला निसर्ग व संस्कृतीच्या जतनासाठी तयार केले पाहिजे. शेतकरी आणि नागरिकांना जलसाक्षर करण्यासाठी विद्यापीठाने पुढाकार घ्यावा. पर्यावरणविषयक लोकचेतना जागृत करून जलसंवर्धनाचे कार्य समाजाच्या व्यापक सहभागातून पुढे नेले पाहिजे.

नद्यांच्या संवर्धनाविषयी बोलताना डॉ. सिंह यांनी नदी प्रणालीचे नैसर्गिक स्वरूप जपण्याचे आवाहन केले. नद्यांना प्रदूषणापासून वाचवणे आणि त्यांचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे.नद्यांचे नैसर्गिक प्रवाहक्षेत्र आणि पर्यावरणीय रचना अबाधित ठेवण्याऐवजी त्यांच्या काठावर सिमेंट-काँक्रीटच्या भिंती उभारून आपण नद्यांच्या नैसर्गिक व्यवस्थेला हानी पोहोचवत आहोत, असे त्यांनी नमूद केले.पंचगंगा नदीच्या संदर्भातही प्रदूषण नियंत्रण, नदीसंवर्धन आणि शास्त्रीय पद्धतीने जलव्यवस्थापन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

या हवामानविषयक घटनेचे स्वरूप समजून घेऊन त्यानुसार उपाययोजना करणे आवश्यक आहे. वेळीच नियोजन केले नाही, तर भविष्यात मोठ्या संकटांना सामोरे जावे लागू शकते. स्थलांतरात वाढ होण्या बरोबरच अन्नधान्य उत्पादन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे लोक चेतना जागृत करून जलस्रोतांचे संरक्षण आणि नद्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे.

अध्यक्षीय भाषणात प्रा. (डॉ.) माणिकराव साळुंखे यांनी तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर वाढत असतानाच पर्यावरण विषयक जनजागृतीसाठी लोकां मध्ये मिसळून काम करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, की बदलत्या हवामा नाचे परिणाम भविष्यात अधिक तीव्र होऊ शकतात. या बद लांचा फटका कोल्हापूर सारख्या सधन प्रदेशालाही बसण्याची शक्यता असल्याने पर्यावरण संवर्धनासाठी आता पासूनच कृतीशील प्रयत्न करणे आवश्यक आहे.

डॉ. राजेंद्र सिंह यांनी पावसाच्या पाण्याचे संवर्धन करण्यासाठी विद्यापीठाला दिलेले मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले आहे. त्यानुसार विद्या पीठाने जलसंधारण आणि पाणी व्यवस्थापनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे. पाण्याची साठवणूक आणि त्याच्या वापराचे योग्य नियोजन करून विद्यापीठाने कोट्यवधी लिटर पाण्याच्या व्यवस्थापनाचे उदाहरण निर्माण केले आहे, असे प्रा.साळुंखे यांनी सांगितले. महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पाहिलेले आधुनिक भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी पर्यावरण संरक्षणाला महत्त्व देणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानातील प्रगतीसोबतच निसर्गाशी सुसंवाद राखणारा विकास साधला पाहिजे. त्यासाठी समाजात पर्यावरणविषयक जाणीव निर्माण करून नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवणे गरजेचे आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्यूज
03 NOV 2026



गुजरात येथील पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग (पुरुष) स्पर्धेत शिवाजी विद्यापीठास ५ पदकांसह सर्वसाधारण उपविजेते पदाचा बहुमान

कोल्हापूर, (महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज):

सकलचंद पटेल विद्यापीठ, गुजरात येथे सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ पुरुषांच्या वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठास ३ सुवर्ण, १ रौप्य व १ कास्य पदकासह सर्वसाधारण उपविजेते पदाचा बहुमान मिळवीला विजेत्या खेळाडूंची नावे...

वल्लभ जुगळे - सुवर्ण पदक (६० किलो), यश खंडागळे - सुवर्ण पदक (७५ किलो), हर्षवर्धन कदम - सुवर्ण पदक (११० किलो), निखिल कोळी - रौप्य पदक (७० किलो), सोहम राठोड - कास्य पदक (११०+ किलो)

सुजल पाटील - चतुर्थ पदक (८५ किलो), विजेत्या खेळाडूंची निवड दिनांक ४ ते ९ डिसेंबर २०२६ अखेर कलिंगा युनिव्हर्सिटी, ओडिसा येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ वेट लिफ्टिंग स्पर्धेसाठी झाली.



विजेत्या खेळाडूंना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. रजनीश कामत, प्र -कुलगुरू प्रा. डॉ. सौ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि क्रीडा संचालक प्रा.डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच संघ व्यवस्थापक म्हणून कृष्णा महाविद्यालयाचे प्रा. डॉ. विशाल साळुंखे, देवचंद कॉलेजचे प्रा. डॉ. रवींद्र चव्हाण व प्रशिक्षक म्हणून श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाचे प्रा. डॉ. प्रशांत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 3 NOV 2026 सिंधुदुर्ग समाचार

दै.सिंधुदुर्ग समाचारने जनजागृतीच्या उपक्रमात सातत्य ठेवावे : कुलगुरू डॉ. कामत



कोल्हापूर/प्रतिनिधी :

दैनिक सिंधुदुर्ग समाचार कोल्हापूरच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विशेष पुरवणीचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनिश कामत यांच्या हस्ते नुकतेच नागाळा पार्क येथील दैनिकाच्या कार्यालयात करण्यात आले. या प्रकाशन सोहळ्याच्या निमित्ताने पत्रकारिता, सामाजिक बांधिलकी, लोकशाही मूल्ये आणि मतदार जनजागृती अशा विविध विषयांवर विचारमंथन झाले. यावेळी विभागीय माहिती कार्यालयाच्या सहाय्यक संचालक वृषाली पाटील, शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर, अनिल निगडे, राजेंद्र मकोटे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी दैनिक सिंधुदुर्ग समाचारचे संपादक आशिष कदम यांनी वृत्तपत्राच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध सामाजिक आणि लोकशाहीपूरक उपक्रमांची माहिती दिली. विशेषतः मतदारांमध्ये मतदानाविषयी जागरूकता निर्माण करणे, लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढविणे आणि मतदानाचे महत्त्व समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचा त्यांनी आढावा घेतला. आम्ही काळात काळात नवोदित युवा मतदारापर्यंत- झेन झी पर्यंत ही मोहीम विविध पैलूंनी सोशल मीडियाचा आधार घेत पोहोचवण्याची गरज राजेंद्र मकोटे यांनी व्यक्त केली .

यावेळी कुलगुरू डॉ. राजनिश कामत यांनी दैनिक सिंधुदुर्ग समाचारच्या या उपक्रमांचे विशेष कौतुक केले. लोकशाही अधिक सक्षम आणि बळकट करण्यासाठी मतदार जनजागृती अत्यंत महत्त्वाची आहे. केवळ निवडणुकीच्या काळातच नव्हे, तर सातत्याने नागरिकांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता आहे. यासाठी वृत्तपत्रे आणि प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते, असे त्यांनी नमूद केले.

मतदार जनजागृतीच्या उपक्रमांमध्ये भविष्यातही सातत्य ठेवावे. त्याचबरोबर समाजातील विविध घटक, युवक, विद्यार्थी, महिला, सामाजिक संस्था आणि ज्येष्ठ नागरिक यांनाही या अभियानात सहभागी करून घ्यावे. लोकशाहीविषयक जागरूकता ही व्यापक लोकचळवळ बनली पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. दैनिक सिंधुदुर्ग समाचारने सामाजिक बांधिलकी जपत सुरू केलेल्या या उपक्रमांना भविष्यातही असेच व्यापक स्वरूप प्राप्त होवो, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा समाजमनावर असलेला प्रभाव, त्यांचे ग्रामविकास, सामाजिक प्रबोधन आणि राष्ट्रीय एकात्मतेविषयीचे कार्य तसेच लोकजागृतीचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने विशेष पुरवणीचे प्रकाशन महत्त्वपूर्ण ठरले. या कार्यक्रमामुळे पत्रकारिता आणि विद्यापीठीय क्षेत्रातील मान्यवरांचा संवाद घडून आला. सामाजिक परिवर्तनासाठी माध्यमांनी लोकशिक्षणाची भूमिका अधिक प्रभावीपणे बजावावी, हा सकारात्मक संदेश या प्रकाशन सोहळ्यातून अधोरेखित झाला.

0 3 NOV 2026

सिंधुदुर्ग समाचार

इमराल्ड डेटाबेस प्रशिक्षणाबाबत कार्यशाळेत ६५ जणांचा सहभाग

कोल्हापूर/प्रतिनिधी : शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्रामार्फत काल, शुक्रवारी (दि. ३०) इमराल्ड इ-जर्नल्स अंतर्गत "नेव्हिगेटिंग दि इमराल्ड प्लॅटफॉर्मः अ गाईड टफॉर रिसर्चर्स, लायब्ररीयन्स अँड स्टुडंट्स" या विषयावर ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेमध्ये एकूण ६५ व्यक्तींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यशाळेसाठी संसाधन व्यक्ती म्हणून वंदना महाजन (नवी दिल्ली) यांनी मार्गदर्शन केले. संशोधन कार्य करताना माहितीचा शोध व प्रतीप्राप्ती तसेच संदर्भ देण्याकरिता उपयुक्तता याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेच्या माध्यमातून प्राध्यापक, संशोधक, ग्रंथपाल आणि विद्यार्थ्यांना इमराल्ड इ-जर्नल्स प्लॅटफॉर्मचा प्रभावी वापर करण्यासंदर्भात उपयुक्त मार्गदर्शन मिळाले. कार्यशाळेच्या आयोजनासाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यशाळेचे प्रास्ताविक प्रभारी संचालक डॉ. धनंजय सुतार यांनी केले. उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांनी परिचय करून दिला. सहायक ग्रंथपाल डॉ. शिवराज थोरात सूत्रसंचालन केले. डॉ. धनंजय गुरव यांनी आभार मानले.

0 3 NOV 2026

सिंधुदुर्ग समाचार

डिजिटल युगात शिक्षणाच्या नव्या संधी : डॉ.ज्योती जाधव

कोल्हापूर/प्रतिनिधी :

डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षणाच्या नव्या संधी विद्यार्थ्यांना मिळणार असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ.ज्योती जाधव यांनी प्रतिपादन केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या वतीने ऑनलाइन एम.बी.ए., ऑनलाइन एम.कॉम. आणि ऑनलाइन एम.एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमांच्या नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ अनुदान आयोग मार्गदर्शन तत्वानुसार तीन दिवसीय 'दीक्षारंभ – विद्यार्थी उद्बोधन कार्यक्रम २०२६–२७' आयोजित करण्यात आला. त्यावेळी त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या.

डॉ.जाधव म्हणाल्या की,पारंपरिक वर्गाधारित शिक्षणापासून आधुनिक ऑनलाइन अध्यापन-अध्ययन पद्धतीकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. शिक्षण, विद्यार्थ्यांची प्रतिभा, कौशल्य विकास आणि मानवी मूल्ये यांचा सुंदर संगम या उपक्रमातून मिळतोय ही अभिनंदनीय गोष्ट आहे.विद्यार्थ्यांनी स्वयंशिस्त, वेळेचे योग्य नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर केला पाहिजे. केवळ पदवी संपादन न करता व्यावहारिक ज्ञान, नेतृत्वगुण, संवादकौशल्य आणि व्यावसायिक नैतिकता विकसित करण्यावर भर दिला पाहिजे. आजच्या काळात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार कौशल्याधारित व गुणवत्तापूर्ण शिक्षण महत्वाचे आहे.

संचालक प्रा.डॉ. पी. एस. पाटणकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ.नगिना माळी आणि श्रीमती प्रियांका सुर्वे यांनी सूत्रसंचालन केले, तर दयानंद गवाडे यांनी आभार मानले.

दुसऱ्या दिवशी वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. केदार व्ही. मारुळकर यांनी 'ऑनलाइन शिक्षणाचे चार चतुष्कोन (Four Quadrants of Online Learning)' या विषयावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या दिवशी बहाई अकादमी, पाचगणीचे वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी व कार्यक्रम समन्वयक श्री. पराग टंडले यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील व्यावसायिक उत्कृष्टता, नैतिक विकास आणि मानवी मूल्यांसाठी शिक्षण' या विषयावर प्रेरणादायी व्याख्यान दिले. प्रियांका सुर्वे यांनी समारोप सत्राचे सूत्रसंचालन केले, तर श्रीमती नाझिया मुल्लानी यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

03 NOV 2026

सिंधुदुर्ग समाचार

'दृष्टीहीन महिलांसाठी तंत्रज्ञान' कार्यशाळेला विद्यापीठात उत्साही प्रतिसाद



कोल्हापूर/प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठाच्या 'युजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज आणि समावेशी शिक्षण संसाधन केंद्राच्या वतीने "दृष्टीहीन महिलांसाठी तंत्रज्ञान" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेला मोठा उत्साही प्रतिसाद लाभला.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते रोपट्याला पाणी घालून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. दूरशिक्षण केंद्र संचालक डॉ. प्रतिभा पाटणकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ. विलास शिंदे यांनी यावेळी 'दृष्टीदिव्यांग महिलांसाठी विकास धोरण' या विषयावर व्याख्यान दिले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील अनाथ आणि दिव्यांगांसाठी असलेल्या कल्याणकारी तरतुदींचा ऐतिहासिक संदर्भ त्यांनी दिला. संतोष परीट यांनी 'दृष्टीहीन महिलांच्या जीवनात तंत्रज्ञानाचे महत्त्व' या विषयावर विचार मांडले.

दुसऱ्या सत्रात नॅबचे उपाध्यक्ष उदय माने यांनी 'दृष्टीहीन महिलांची सुरक्षा व त्यासाठीच्या उपाययोजना' यावर मार्गदर्शन केले. स्कूल ऑफ नॅनोसायन्सचे डॉ. प्रमोद पाटील यांनी 'दैनंदिन जीवनात प्राणायामाचे महत्त्व' आणि डॉ. प्रतिभा देसाई यांनी 'स्वयंशिस्त व शी टॉक उपक्रमांतर्गत दृष्टीहीन महिलांशी संवाद' यावर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेस उपस्थित सर्व दृष्टीदिव्यांग महिलांनी विद्यापीठात पी.एम. उषा योजनेअंतर्गत सुरू असलेल्या चॉकलेट प्रकल्पाला भेट दिली. कल्याणी मोमे यांनी सूत्रसंचालन केले. सतीश नवले यांनी आभार मानले.

0 3 NOV 2026

पुढारी समाचार

सरदार पटेल, इंदिरा गांधी यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर/प्रतिनिधी :

भारताचे लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा स्मृतिदिन या निमित्ताने त्यांच्या स्मृतींना आज शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आज सकाळी सरदार पटेल आणि इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांना कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. तद्नंतर, सर्व उपस्थितांनी एकता व सद्भावना यांची शपथ घेतली. डॉ. प्रमोद कसबे यांनी शपथ प्रदान केली.

यावेळी कुलसचिव डॉ.विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. अजितसिंह जाधव, स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. किरण कुमार शर्मा, रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेलचे समन्वयक डॉ. तुकाराम डोंगळे, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. संतोष सुतार, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. सुर्यबाला सावंत, डॉ. देवश्री पाटील, डॉ. सोमनाथ पवार, डॉ. स्नेहा पाटील, डॉ. योजना पाटील, डॉ. तेजस्विनी भट यांच्यासह विविध अधिविभागांचे शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 NOV 2026 कांतीसिंह

विद्यापीठात अभिजात मराठीचे गौरवगान

कोल्हापूर (प्रतिनिधी):- अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झालेल्या मायमराठीचे जतन, संवर्धन आणि प्रचार, प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रतिबद्ध आहे. त्यासाठी राज्यभरात अनेक वैविध्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनीही मराठीच्या संवर्धनासाठी आपला वाटा उचलण्यास सिद्ध व्हावे, असे आवाहन राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ साहेब सभागृहात आज सायंकाळी महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने अभिजात मराठी भाषा सप्ताह -२०२६ या उपक्रमांतर्गत आयोजित 'अभिजात मराठी, अभिमान मराठी' या सांगितिक - सांस्कृतिक कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. देवरे बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. राजनीश कामत होते तर प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव प्रमुख उपस्थित होत्या. अभिजात मराठी भाषेचे गौरवगान करणाऱ्या या कार्यक्रमास प्रेक्षक, श्रोत्यांचा प्रचंड जल्लोषी प्रतिसाद लाभला. उद्घाटन प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, मराठी भाषेच्या अनेक बोलींमध्ये कोल्हापूरची मराठी ही केवळ देशातच नव्हे, तर जगात वैशिष्ट्यपूर्ण आणि लोकप्रिय आहे. या भाषेचा आपण नेहमी अभिमान मिरवला पाहिजे.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल राज्यभरातील विद्यापीठांत सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठालाही या गोष्टीचा मोठा अभिमान असल्याने हा कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे. येथून पुढेही असे मराठी भाषेच्या गौरवपर कार्यक्रम आयोजित करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. सुरवातीला मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी मंचावर कुलसचिव डॉ. विलास शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाला विद्यापीठाचे वरिष्ठ अधिकारी, विविध अधिकार मंडळांचे सदस्य, अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोल्हापूरचे सुपुत्र असलेले सुप्रसिद्ध गायक बंधू डॉ. अभिजीत कोसंबी आणि प्रसेनजीत कोसंबी यांनी आपल्या गायनवैविध्याने अभिजात मराठीचा हा कार्यक्रम गाजविला. भक्तीगीतांपासून वासुदेव गीतांपर्यंत आणि आदिवासी गीतांपासून चित्रपट गीतांपर्यंत अशी अनेकविध गीते गाऊन त्यांनी कार्यक्रमात मोठी रंगत आणली. त्यांना गायिका सपना हेमण यांची साथ लाभली. दिगंबर नाईक यांचे नेटके संयोजन लाभलेल्या या कार्यक्रमात मराठी भाषेचे वैविध्य आणि वैभव दर्शविणाऱ्या गीतांबरोबरच मंगळागौर, लावणी, आदिवासी, गोविंदा, कोळीनृत्य इत्यादी नृत्यप्रकारांचेही सादरीकरण करण्यात आले. प्रेक्षकांचा त्यांना जल्लोषी प्रतिसाद लाभला.

0 3 NOV 2026
पुढारी

विद्यापीठात आजपासून व्याख्यानमाला

कोल्हापूर : न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या १२५ व्या स्मृती



वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे मंगळवारपासून (दि. ३) 'महादेव गोविंद रानडे : काळ आणि कर्तृत्व' या विषयावर दोनदिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. ३ नोव्हेंबर रोजी किशोर बेडकिहाळ, डॉ. नीरज हातेकर, डॉ. भारती पाटील, डॉ. रणधीर शिंदे यांच्यासह विविध मान्यवर रानडे यांच्या सामाजिक, आर्थिक आणि प्रबोधनपर विचारांवर भाष्य करतील. दि. ४ रोजी डॉ. नागोराव कुंभार, डॉ. प्रकाश पवार, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. नंदकुमार मोरे व डॉ. अशोक चौसाळकर यांची व्याख्याने होतील. व्याख्यानमालेस उपस्थित राहण्याचे आवाहन इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 3 NOV 2026

सकाळ

अनुभवी प्रो-कबड्डीपटू विद्यापीठाच्या ताफ्यात

राष्ट्रीय स्पर्धेसाठी जोरदार तयारी : दादासाहेब पुजारीसह पाच जणांचा समावेश

■ सचिन भोसले : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २ : पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी अजिंक्यपद स्पर्धा मध्य प्रदेशातील सागर येथे १२ ते १८ नोव्हेंबर दरम्यान होणार आहे. यंदा विजेतेपद मिळविण्याच्या निर्धाराने संघ मैदानात उतरणार आहे. त्यासाठी विद्यापीठाच्या कुस्ती संकुलात रोज सहा तासांहून अधिक काळ कसून सराव सुरू आहे. विशेष म्हणजे पुणेरी पलटण, तमिळ थलायवाज, पटना पायरेट्स आणि तेलगू टायटन्स या संघांचे प्रतिनिधित्व केलेले दादासाहेब पुजारीसह पाच जणांचा संघात समावेश आहे.

या स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा कबड्डी संघ मागील वर्षांच्या दमदार कामगिरीवर थेट उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरला आहे. त्यामुळे यंदा विजेतेपदाच्या शर्यतीत संघाकडून मोठ्या अपेक्षा आहेत. या स्पर्धेत महाराष्ट्रासह गोवा, मध्यप्रदेश, गुजरात आणि राजस्थानमधील एकूण १३४ विद्यापीठांचे संघ सहभागी होणार आहेत. स्पर्धेत गेली कित्येक वर्षे शिवाजी विद्यापीठाने कबड्डीत अव्वल स्थान कायम ठेवले आहे. निवडलेल्या २० जणांचा संघ शिवाजी विद्यापीठांतर्गत झालेल्या आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेतून निवडला आहे. या संघाचे सराव शिबिर २८ ऑक्टोबरपासून सुरू असून, ते स्पर्धेसाठी रवाना होण्यापूर्वी दोन दिवस अगोदर संपणार आहे. त्यातून चौदा जणांचा अंतिम संघ निवडला जाणार आहे.

विशेष म्हणजे शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा विभाग संचालक डॉ. शरद बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक डॉ. देवेंद्र बिरनाळे हे या खेळाडूंचा कसून सराव आणि आधुनिकतेचे धडे देत आहेत. सकाळी तीन तास कसून सराव घेतला जातो. यात एक तास दहा मिनिटे केवळ तंदुरुस्तीवर भर दिला जातो. त्यानंतर केवळ कौशल्ये, डाव, चपळ हालचाली, स्ट्रेचिंग, योगासन यावर भर दिला जातो. त्यानंतर सराव घेतला जातो. सायंकाळच्या सत्रात अर्धा तास व्यायाम आणि त्यानंतर प्रत्यक्ष सामना सराव घेतला जातो. विशेष म्हणजे सहा तासांच्या सरावातून खेळाडूंची शारीरिक क्षमता, चढाई, पकड आणि सांघिक समन्वयावर भर दिला जात आहे. प्रो-कबड्डीचा अनुभव असलेल्या खेळाडूंच्या सहभागामुळे शिवाजी विद्यापीठाच्या संघाची ताकद वाढली असून, यंदा विजेतेपद मिळवण्यासाठी संघाने कंबर कसली आहे.



कोल्हापूर : मध्यप्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या कुस्ती संकुलात विद्यापीठाच्या कबड्डी संघाचा कसून सराव सुरू आहे. (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

प्रो-कबड्डीपटूंच्या अनुभवाची साथ

संघात पुणेरी पलटणचे प्रतिनिधित्व केलेला दादासाहेब पुजारी हा संघात उजवा रक्षक, प्रतिस्पर्धी संघातील खेळाडूंना पकडणे, त्यांना रोखणे आणि बचावफळीतील साखळी मजबूत ठेवणे अशी, तर पुणेरी पलटणचाच दुसरा खेळाडू वैभव राबाडे हा अष्टपैलू खेळाडू असून, तो संघात मध्यरक्षकाची भूमिकाही नेटाने बजावतो. तमिळ थलायवाजचा आघाडीचा खेळाडू सौरभ फगरे हा रेडर आणि कोणत्याही स्थानावर खेळू शकणारा अष्टपैलू खेळाडू आहे. तर पटणा पायरेट्सचा साहील पाटील हाही आक्रमक खेळाडू आहे. यासह तेलगू टायटन्सचा साईप्रसाद पाटील हा उजवा मध्यरक्षक, संघावर संपूर्ण नियंत्रण ठेवणारा खेळाडू आहे.

> ऐकेकाळी शिवाजी विद्यापीठाच्या कुस्ती आणि कबड्डी संघाचा देशभरात दबदबा होता. हाच दबदबा शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून पुन्हा एकदा निर्माण करण्याच्या दृष्टीने खेळाडूंचा कसून सराव विद्यापीठातील कुस्ती संकुलात सुरू आहे. विशेष म्हणजे या संकुलात खेळाडूंसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे मॅटसह सर्वच सुविधा एकाच छताखाली आहेत. यासाठी कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे विशेष सहकार्य आणि मार्गदर्शन लाभत आहे.
>
> **- डॉ. शरद बनसोडे,** क्रीडा विभाग संचालक, शिवाजी विद्यापीठ

0 3 NOV 2026

पुण्यनगरी

विशाल बनसोडेची विद्यापीठ संघात निवड



गडहिंग्लज : येथील ओंकार महाविद्यालयाचा खेळाडू विशाल बनसोडे याची बेंगळूर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. ही स्पर्धा शनिवार, दि. ७ रोजी होणार आहे. त्याला संस्थाध्यक्ष राजन पेडणेकर, प्राचार्य डॉ. मनोहर पुजारी, प्रकाश कांबळे यांचे प्रोत्साहन, तर सुरेश धुरे यांचे मार्गदर्शन लाभले.

0 3 NOV 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत 'पैरा' एकांकिका प्रथम

प्राथमिक फेरीत पैरा प्रथम, मागच दार द्वितीय, शाब्बास पठ्ठे तृतीय

जनप्रवास : कोल्हापूर

पुरुषोत्तम करंडक आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत आदर्श कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे (जि. सातारा) यांच्या 'पैरा' या एकांकिकेने प्रथम क्रमांक पटकावला. यांसह या संधाने पुणे येथे होणाऱ्या महाअंतिम फेरीतही प्रवेश केला. संगीत व नाट्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ यांची 'मागचं दार' ही एकांकिका दुसरी आली, तर देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेजची 'शाब्बास पढे' ही एकांकिका तिसरी आली, तर भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालयाची 'साठी' ही सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिका ठरली. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. महाराष्ट्र कोपासक, पुणे तर्फे राज्यस्तरीय पुरुषोतम करंडक एकांकिका स्पर्धा संगीत व नाट्यशास विभाग, शिवाजी विद्यापीठ आणि गायन समाज देवल क्लब यांच्या सहकायनि झाली. स्पधेत १६ संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे चंद्रशेखर कुलकर्णी, श्रीनिवास एकसंबेकर, सोनाली मगर यांनी फौक्षक महणून काम पाहिले.

यावेळी संगीत व नाट्यशास विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई, गायन समाज देवल क्लबचे सुबोध गरे, सचिन पुरोहित आणि अमेप साठे उपस्थित होते.



प्रथम क्रमांकाचे पारितोषिक कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते स्वीकारताना 'पैरा' एकांकिकेतील सातारा जिल्ह्यातील नागठाणे आदर्श कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे कलाकार.

वैयक्तिक पारितोषिके

अभिनय नैपुण्य पुरुष : महेश चौगुले, शाब्बास पठ्ठे एकांकिका (कॉमर्स कॉलेज)

अभिनय नैपुण्य स्त्री : श्वेता देसाई, 'मागचं दार एकांकिका (संगीत व नाट्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ)

अभिनय नैपुण्य - स्त्री : श्रद्धा मेटील, 'साठी' एकांकिका (भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालय)

सर्वोत्कृष्ट लेखक : अजय सातर्वेकर, 'मागचं दार' एकांकिका (संगीत व नाट्यशास विभाग, शिवाजी विद्यापीठ)

सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक : श्रद्धा पेटील, शौनक कुलकर्णी, 'साठी' एकांकिका (भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालय)

अभिनय उत्तेजनार्थ पारितोषिके : प्रणाली कदम (मंडम), धनश्री पठकुरे (ओअॅसिस), हर्षिता मंडपे (आभास), प्रणाली पेठकर (चिठ्ठी), आविष्कार कांबळे यांना मिळाली आहेत.

जनसंपर्क कक्ष
03 NOV 2026
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

नूलच्या ७ हॉकीपटूंची शिवाजी विद्यापीठ संघात निवड

नूल : पुढारी वृत्तसेवा

हॉकीची पंढरी म्हणून राज्यात नावलौकिक असलेल्या नूल (ता. गडहिंग्लज) या छोट्याशा खेड्यातील तब्बल सात हॉकीपटूंची आंतरविद्यापीठ पश्चिम विभागीय हॉकी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ महिला हॉकी संघात निवड झाली आहे. कोल्हापूर येथे विद्यापीठाच्या इंटर झोन हॉकी स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेतून जयपूर येथे होत असलेल्या विद्यापीठाचा पश्चिम विभागीय स्तरावरील अंतर विद्यापीठ हॉकी स्पर्धेसाठी संघ निवडण्यात आला. यामध्ये नूल येथील वासंती वडगोळ, तेजश्री खणदाळे, सारिका आरबोळे, मनीषा देसाई, सानिका चिरमुरे, भक्ती गड्डी, रेवती चव्हाण यांचा समावेश आहे. या हॉकीपटू इंदिरादेवी जाधव न्यू इंग्लिश स्कूल टेक्निकल अँड ज्युनिअर कॉलेज नूलच्या माजी विद्यार्थिनी आहेत. त्यापैकी वासंती, तेजश्री, सारिंका, मनीषा, सानिका या गडहिंग्लज येथील डॉ. घाळी महाविद्यालय, भक्ती ही शिवराज महाविद्यालय तर रेवती ही डॉ. ए. डी. शिंदे पॉलीटेक्निक कॉलेजमध्ये पुढील शिक्षण घेत आहेत. या खेळाडूंना क्रीडाशिक्षक रमेश चौगुले, मनोहर मांगले, सचिन पोवार यांचे मार्गदर्शन तर प्राचार्य श्रीशैलाप्पा साखरे, प्राचार्य दत्ता पाटील, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम, प्राचार्य डॉ. दिनकर घेवडे यांचे प्रोत्साहन लाभले.



नूल : इंदिरादेवी जाधव स्कूल व कॉलेजच्या निवड झालेल्या हॉकीपटू.

11/3/26, 2:50 PM 03 NOV 2026 क्रांतीसिंह 20261103_135107.jpg
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यापीठात महर्षी वाल्मिकी जयंती

कोल्हापूर (प्रतिनिधी):- शिवाजी विद्यापीठात महर्षी वाल्मिकी जयंती साजरी करण्यात आली. प्र-कुलगुरू डॉ.ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ.विलास शिंदे यांच्या हस्ते मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ.सुहासिनी पाटील, पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ.आसावरी जाधव, डॉ.सोनल चोंदे, डॉ.स्मिता पोरे, संभाजी परीट, कृष्णात पोवार यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक आणि विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.